मोटार अपघात प्रकरण क्र. १९९/२०२१
महम्मद वि. पवन व इतर
नि.क्र. १९ **CW-1**

**<u>शपथेवर उलटतपास गैरअर्जदारा क्र.३ तर्फे ॲडव्होकेट श्री. एस.जी डोईजोडे</u>**

८. घटनेच्या वेळी मी स्वत: गाडी चालवत होतो. अपघात राष्ट्रीय महामार्ग क्र.४९ वर घडला. मी मुंबईहून कोलकत्ताला जाण्यासाठी माझ्या ट्रकने निघालो होतो. दुसरा ट्रक समोरच्या बाजूने येत होता. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४९ हा एकूण चार पदरी आहे. महामार्गामध्ये दुभाजक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, समोरुन येणारे वाहन हे त्याच्या योग्य दिशेने रस्त्याच्या डावी बाजू धरुन जात होता. फिर्यादी सद्दाम हा माझा सख्खा छोटा भाऊ आहे. तो माझ्यासोबत ट्रकमध्ये नव्हता. सद्दामने बिसोई पोलीस स्टेशनमध्ये अपघातानंतर चार ते पाच दिवसांनी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ असल्याने सद्दामने समोरच्या ट्रकविरुदध खोटी फिर्याद दिली. पोलीसांनी समोरच्या ट्रकचालकाविरुद्ध चार्जशिट दाखल केली. मी त्या चार्जशिटची प्रत दाखल करु शकतो. गैरअर्जदार क्र.१ विरुद्ध झालेल्या फौजदारी केसचा निकाल काय झाला हे मला माहिती नाही. रस्ता पूर्व-पश्चिम होता की उत्तर-दक्षिण होता मला सांगता येणार नाही. माझी ट्रक कोणत्या दिशेकडून कोणत्या दिशेकडे जात होती हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगतो की समोरचा ट्रक डब्ल्यु बी-०३/डी-१६२४ चा चालक ट्रक हयगयीपणे व निष्काळजीपणे आणि वेगात चालवित होता. हे म्हणणे खरे नाही की, झालेल्या अपघातात माझाच निष्काळजीपणा होता.

९. हे म्हणणे खरे नाही की, पंडीत रघुनाथ मारमू हॉस्पीटलमधून मी व्यवस्थीत झाल्यामुळे चार दिवसानी जाण्याची परवानगी दिली. इसरा हॉस्पीटल, हैद्राबाद येथे मी दोन दिवस भरती होतो.

प्रश्न – दोन दिवसानंतर हॉस्पीटलने तुम्हाला डिसाचार्ज दिला ?

उत्तर– मी स्वत:च दोन दिवसानंतर डिसचार्ज घेतला.

१०. उस्मानिया हॉस्पीटल हे शासकीय हॉस्पीटल आहे. तेथे मोफत इलाज केला जातो. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगतो की माझ्या इलाजासाठी दोन लाख रुपये खर्च झाला. हे म्हणणे खरे नाही की, अपघातात मला कांहीही अपंगत्व आलेले नाही आणि मी डॉक्टरचे खोटे सर्टीफिकेट दाखल केले आहे. मी माझे ड्रायव्हींग लायसन्स दाखल करु शकतो. ते लातूर आरटीओ ऑफीसमधून काढलेले आहे. मी आता ड्रायव्हींग करु शकत नाही म्हणून आरटीओ ऑफीसमध्ये जाऊन मी माझे ड्रायव्हींग लायसन्स रद्द करुन घेतले नाही. मी माझी ट्रक विकलेली आहे. माझ्या शपथपत्रात माझ्या ट्रकवर ड्रायव्हर ठेवावा लागेल हे लिहिलेले बरोबर नाही. मी महिन्याला पंचवीस हजार रुपये कमवित होतो याबाबत अकाऊंट ठेवलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जी नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे ती चुकीची केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्या हॉस्पीटलमधील डॉक्टरांनी माझ्यावर उपचार केला त्यांनी मला अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्याने मी लातूर येथील डॉक्टराकडून खोटे प्रमाणपत्र घेतले. मी ट्रक विकलेला आहे याचा उल्लेख माझ्या शपथपत्रात नाही, परंतु त्या संबंधात कागदपत्र दाखल केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वाढीव नुकसान भरपाई मिळावी म्हणून मी ट्रक विकल्या संबंधी खोटे कागदपत्र दाखल केले आहेत. अपघाताच्या वेळी माझे वय ४० वर्ष होते हे दाखविण्यासाठी शाळेतील कागदपत्र दाखल केलेले नाहीत, मी ते दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जात आणि शपथपत्रामध्ये माझे जे वय सांगितलेले आहे ते खोटे आहे. हे

म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगतो की मी वजन उचलू शकत नाही, पूर्णपणे जमीनीवर पाय टेकू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगतो की मी आता वाहन चालवू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIDYADHAR SHESHARAO MORE
Date: 2026.02.13 11:29:07 +0530

( विद्याधर शे. मोरे )

दिनांक :–१२/०२/२०२६

सदस्य
मोटार अपघात प्राधिकरण, लातूर